**<u>ठळक बातम्या</u>**

- पाकिस्तानकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या आयातवर बंदी
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अंगोलाचे अध्यक्ष जोआओ मॅन्युएल गोंकाल्विस लॉरेन्को यांच्यात आज शिष्टमंडळ स्तरावर चर्चा
- वेव्हज २०२५ परिषदेत ७ आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर आयआयसीटीचे समझोता करार
- महाराष्ट्रातल्या येरला वाणी कम्युनिटी रेडियो केंद्राला वेव्हज् २०२५मधे राष्ट्रीय पुरस्कार

**आणि**

- गोव्यात शिरगाव इथं लईराई देवीच्या जत्रेत आज पहाटे झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू ८० जण जखमी

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्यानंतरच्या धोरणाचा भाग म्हणून भारताने पाकिस्तानकडून आयात बंद केली आहे. पाकिस्तानातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या निर्यात झालेल्या किंवा वाटेत असलेल्या सर्व प्रकारच्या वस्तूंवर तात्काळ बंदी घातल्याची अधिसूचना परदेश व्यापार महासंचालनालयाने जारी केली आहे. यातून सूट मिळवायची असल्यास सरकारची वेगळी परवानगी घ्यावी लागेल असं अधिसूचनेत म्हटलं आहे.

**<><><><><>**

चीनमध्ये शांघाय आणि गॉन्गझू इथल्या भारताच्या डिप्लोमॅटिक मिशन च्या कार्यालयांमध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभा आयोजित करण्यात आल्या . यावेळी

कॉन्सुलेटच्या अधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने भारतीय समुदाय उपस्थित होता.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अंगोलाचे अध्यक्ष जोआओ मॅन्युएल गोंकाल्विस लॉरेन्को यांच्यात आज नवी दिल्लीत शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा सुरु आहे. विविध क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षरी होण्याची अपेक्षा आहे. अंगोलाचे अध्यक्ष लॉरेंको काल तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर नवी दिल्लीत आले असून विमानतळावर परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी त्यांचे स्वागत केले. अंगोलाच्या अध्यक्षांसोबत अनेक मंत्री, वरिष्ठ अधिकारी, उद्योगपति आणि माध्यमांचे प्रतिनिधींचा समावेश असलेलं उच्चस्तरीय शिष्टमंडळ आहे.

लॉरेन्को यांचं आज राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात औपचारिक स्वागत करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पाहुण्यांच्या सन्मानार्थ आज राष्ट्रपती भवनात मेजवानी आयोजित केली आहे.

अंगोलाचे राष्ट्राध्यक्ष ३८ वर्षांनंतर भारत भेटीवर आले आहेत. भारत आणि अंगोला यावर्षी राजनैतिक संबंधांच्या स्थापनेचा ४० वा वर्धापन दिन साजरा करत आहेत.राष्ट्राध्यक्ष लॉरेन्को उद्या नवी दिल्ली इथं होणाऱ्या एका व्यवसायिक कार्यक्रमात सहभागी होतील. भारत आणि अंगोला दरम्यानचा व्यापार सातत्याने वाढत असून २०२३-२४ दरम्यान ४ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. संयुक्त राष्ट्रांसह विविध बहुपक्षीय मंचांवर दोन्ही देश सोबत आहेत.

**<><><><><>**

देशाच्या परकीय चलन साठ्यात २५ एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात अंदाजे २ अब्ज डॉलर्सची वाढ झाली असून तो सुमारे ६८८ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे. रिझर्व्ह बँकेनं प्रकाशित केलेल्या साप्ताहिक आकडेवारीत म्हटलंय की, गेल्या आठवड्यात, परकीय चलन मालमत्ता, २ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक वाढून सुमारे ५८० अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. दरम्यान, विशेष कर्जपात्रता हक्क २ कोटी १०लाख डॉलर्सनं वाढून १८ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाले आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये मध्यवर्ती बँकेची पतही २० लाख डॉलर्सने वाढून साडेचार अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. तथापि, सोन्याचा साठा २०७ दशलक्ष डॉलर्सनं कमी होऊन ८४ पूर्णांक ३७ शतांश अब्ज डॉलर्सवर आला आहे.

**<><><><><>**

प्रसारमाध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात भारत जगाचं नेतृत्व करु शकतो असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. ते आज मुंबईत पत्रकारपरिषदेत बोलत होते.....

**होल्ड- बाईट- वैष्णव....**

गुगल, मेटा आणि मायक्रोसॉफ्ट सह ७ आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी आज वेव्हज २०२५ परिषदेत Indian Institute of Creative Technology बरोबर समझोता करार केले. अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

कम्युनिटी रेडिओच्या देशभरात सुरु असलेल्या कार्याची, माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल मुरुगन यांनी प्रशंसा केली आहे. ते आज वेव्हज् परिषदेत कम्युनिटी रेडिओच्या उदघाटन सत्राला संबोधित करताना

बोलत होते. सर्व कम्युनिटी रेडिओ काही उद्दिष्टांनी चालवली जात असून त्यामुळे आपल्या परंपरांना प्रोत्साहन मिळत आहे असं ते म्हणाले. दहाव्या राष्ट्रीय कम्युनिटी रेडिओ पुरस्कारांचं वितरण मुरुगन यांच्या हस्ते यावेळी झालं. नवोन्मेष श्रेणीत राज्यातल्या **येरला वाणी** या कम्युनिटी रेडिओला राष्ट्रीय पातळीवर पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. कम्युनिटी रेडिओच्या कामकाजातून समर्पण आणि वचनबद्धता प्रतीत होत असल्याचं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

ब्रिटनचे माजी राजपुत्र प्रिन्स हॅरी यांनी ब्रिटिश राजघराण्याशी संबंध पुनर्स्थापित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. बीबीसी ने घेतलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. ब्रिटिश राजघराण्याचा सक्रिय सदस्य म्हणून आपल्या भूमिकेचा त्यांनी आपल्या पत्नीसह २०२० साली त्याग केला होता आणि अमेरिकेत स्थलांतर केलं होत . त्यानंतर त्यांची सुरक्षा व्यवस्था कमी करण्यात आल्याबद्दल त्यांनी राजघराण्याला जबाबदार धरलं होत. सुरक्षाव्यवस्था पुन्हा पहिल्याप्रमाणे करण्यासाठी दाखल केलेली याचिका ब्रिटनच्या उच्च न्यायालयाने काल फेटाळली आहे. त्यामुळे आता यापुढे आपल्याला ब्रिटिश राजघराण्याकडून आमंत्रण आलं तरच पुरेशी सुरक्षा व्यवस्था मिळू शकते असं त्यांनी मुलाखतीत सांगितलं.

**<><><><><>**

गोव्यात शिरगाव इथल्या लईराई देवीच्या जत्रेत आज पहाटे झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला असून ८० जण जखमी झाले आहेत. देवळाच्या आवारात निखाऱ्यांवरून अनवाणी चालण्याच्या पारंपरिक

कार्यक्रमासाठी आज पहाटे प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी भाविकांमध्ये अचानक गोंधळ माजून ढकलाढकली झाली आणि अनेक जण एकमेकांच्या अंगावर पडून जखमी झाले. या घटनेची माहिती कळताच स्थानिक पोलीस आणि आपत्ती निवारण दल यांनी घटनास्थळी पोचून त्यांनी मदतकार्य सुरु केलं . जखमींना म्हापसा जिल्हा रुग्णालयात दाखल केलं असून गोव्याचे मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी रुग्णालयाला भेट देऊन जखमींची विचारपूस केली, तसंच त्यांच्या उपचारांचा पूर्ण खर्च सरकारतर्फे केला जाईल असं जाहीर केलं . अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून….

**होल्ड- बाईट- महेश चोपडे…**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं असून जखमींना लवकर बरं वाटावं अशी कामना  व्यक्त केली आहे. या कठीण प्रसंगात केंद्र सरकारचा   गोवा सरकारला पूर्ण पाठिंबा असून आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी स्थानिक प्रशासन तत्पर असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

५ ते १८ वर्षे वयोगटातल्या मुलांसाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ साठी या वर्षीच्या ३१ जुलैपर्यंत इच्छूक आपले अर्ज दाखल करू शकतात. शौर्य, समाजसेवा, पर्यावरण, क्रीडा, कला आणि संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञान यासारख्या श्रेणींमध्ये उत्कृष्टता दाखविणाऱ्या मुलांना हा पुरस्कार दिला जातो. सर्व अर्ज awards.gov.in या अधिकृत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलद्वारे ऑनलाइन सादर करावीत. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार हा देशभरातल्या मुलांच्या अपवादात्मक कामगिरीची दखल

घेण्यासाठी दरवर्षी राष्ट्रपतींकडून दिला जाणारा एक प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर आणि गुजरातमध्ये काल रात्री भूकंपाचे धक्के जाणवले. गुजरातमध्ये झालेल्या भूकंपाची तीव्रता ३ पूर्णांक ४ रिक्टर इतकी नोंदवली गेली तर जम्मू काश्मीर मधल्या भूकंपाची तीव्रता २ पूर्णांक ७ रिक्टर नोंदवली गेली. भूकंपाची तीव्रता कमी असल्यामुळे यात कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही.

**<><><><><>**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज बांद्रा कुर्ला संकुलातल्या प्रस्तावित बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या जागेला भेट देऊन पाहणी केली.

**//<><><><><>//**